मराठवाड्याच्या शिक्षण क्षेत्राच्या विकासात स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या आंतरविद्याशाखीय अंतर्गत शिक्षणशास्त्र या विषयातील विद्यावाचस्पती पदवीच्या अंशत: पूर्ततेसाठी सादर केलेला संशोधन आराखडा

संशोधक

उमेश एकनाथराव वाघमारे

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ. बालाजी जी. गिरगावकर

संशोधन केंद्र

शिक्षणशास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

जुलै : २०२४

अनुक्रमणिका

अ.क्र.	तपशील	पृ.क्र.
1.	शीर्षक	१
2.	अनुक्रमणिका	२
3.	प्रस्तावना	३-४
4.	संशोधनाची गरज	४-५
5.	संशोधनाचे महत्त्व	५
6.	समस्या विधान	५
7.	कार्यात्मक व्याख्या	६
8.	संशोधनाची उद्दिष्टे	६
9.	संशोधनाची गृहीतके	७
10.	संशोधन परिकल्पना	७
11.	शून्य परिकल्पना	८
12.	संशोधनाची व्याप्ती	८
13.	संशोधनाची मर्यादा	८
14.	संशोधन परिमर्यादा	९
15.	संशोधन पद्धती	९
16.	संशोधनाची साधने	१०
17.	संख्याशास्त्रिय परिणामे	१०
18.	संशोधनाची कार्यवाही	१०
19.	प्रकरण रचना	११
20.	अंदाजपत्रक	१२
21.	वेळापत्रक	१२
22.	संदर्भग्रंथ सूची	१३-१४
23.	संशोधक व मार्गदर्शकांचे नाव व सही	१४

प्रस्तावना

मराठवाडा मुक्ती संग्रामचा लढा अनेकांच्या त्याग, बलिदानातून उभा राहिला आहे. हे बलिदान म्हणजे केवळ भक्तिभावाने उधळलेला भंडारा नव्हे, तर आपल्या सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक विकासाची ती एक खूण आहे. ती युगानुयुगे मनात जपायला हवी. मराठवाडा मुक्ती संग्रामाच्यावेळी अर्थात १९४८ च्या दरम्यान शिक्षण क्षेत्रात मराठवाडा नेमका कुठे होता, आज कुठे आहे, याचा विचार करता गेल्या ७५ वर्षांत मराठवाड्यातील शिक्षण क्षेत्रात अभिमान वाटाव्यात अशा अनेक गोष्टी घडल्या आहेत. निजामाच्या राजवटीत हैद्राबाद प्रांतात उर्दू ही प्रशासन, व्यवहाराची भाषा होती आणि मराठवाड्यातील जनतेच्या व्यवहाराची भाषा मराठी होती. पण मराठी माध्यमातून शिक्षण देणाऱ्या शाळा मराठवाड्यात नव्हत्या. त्यामुळे मराठवाड्यातील जनतेच्या शिक्षणाची मोठी परवड होत होती. पश्चिम महाराष्ट्रात महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, विठ्ठल रामजी शिंदे, महर्षी कर्वे या समाजसुधारकांच्या प्रयत्नाने शिक्षणाला चालणा मिळाली होती. महात्मा फुले यांनी पुण्यात भिडे यांच्या वाड्यात १८४८ मध्ये पहिली मुलींची शाळा सुरू केली, तर मराठवाड्यात १९१४-१५ च्या दरम्यान सरस्वती भुवन शिक्षण संस्थेच्या माध्यमातून औरंगाबाद येथे शाळा सुरू झाली. तीच गोष्ट उच्च शिक्षणाच्या बाबतीतही आहे. १८८५ मध्ये पुण्यात फर्ग्युसन महाविद्यालय सुरू झाले, तर मराठवाडयात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रयत्नांतून औरंगाबाद येथे १९५० च्या दरम्यान 'मिलिंद' हे पहिले महाविद्यालय सुरू झाले. त्याच काळात नांदेड येथे स्वामी रामानंद तीर्थ यांनी पीपल्स कॉलेजची स्थापना केली. थोडक्यात पश्चिम महाराष्ट्रच्या तुलनेत मराठवाड्यात शिक्षण पोचायला ७० ते ७५ वर्ष लागली. असे असले तरी पुढे मराठवाड्याने शिक्षण क्षेत्रात पकड घट्ट केली.

ध्येयवादी शिक्षक, त्यागी स्वातंत्र्य सेनानींनी निजामाच्या राजवटीचा विरोध पत्करून, समाजाकडून मदत गोळा करून मराठवाड्याच्या विविध भागांत मराठी शाळा सुरू केल्या. १९२६ मध्ये स्वतः स्वामी रामानंद तीर्थ यांनी उस्मानाबाद जिल्ह्यातील हिप्परगा येथे मराठी शाळा सुरू केली. स्वामी सुरुवातीचे काही वर्षे स्वतः या शाळेचे मुख्याध्यापक होते. यासोबतच सेलू येथे नूतन विद्यालय, अंबाजोगाईचे योगेश्वरी, शिक्षणमहर्षी पंढरीनाथ पाटील शिसोदे यांनी १९४० च्या दरम्यान औरंगाबाद येथे छत्रपती वसतिगृह व मराठा हायस्कुल ही शाळा सुरू केली. पैठण येथील श्री नाथ हायस्कूल, खुलताबाद येथील श्री घृष्णेश्वर विद्यालय, अंबड येथील समर्थ विद्यालय या तालुक्याच्या ठिकाणी पहिल्या शाळा पूर्वश्रमीच्या मराठा व आताच्या विवेकानंद शिक्षण संस्थेनेच सुरू केल्या.

संशोधनाची गरज

संशोधनाचे कार्य करीत असताना एखादा उद्देश समोर असला पाहिजे. संशोधकाचा उद्देश निश्चित झाला तर संशोधनाचे कार्य योग्य दिशेने पुर्णत्वास जावू शकते. हा संशोधनाचा उद्देशच संशोधन कार्याची गरज स्पष्ट करतो. सर्वसामान्यपणे म्हटले जाते की, गरज ही शोधाची जननी आहे. (1) त्यामुळे संशोधनामध्ये संशोधनाच्या गरजेला महत्त्वाचे स्थान आहे. कारण स्वातंत्र्यपूर्व मराठवाड्यामध्ये शिक्षण घेण्यासाठी शिक्षणाच्या सोयी नव्हत्या. त्यामुळे मराठवाड्यात शैक्षणिक मागासलेपण वाढलेले होते. ही बाब लक्षात घेऊन मराठवाडा स्वातंत्र्य झाल्यानंतर मराठवाडा स्वातंत्र्य सैनिकांनी उच्च शिक्षण देणाऱ्या अनेक संस्थेची उभारणी केली. यामध्ये नांदेड येथील पीपल्स कॉलेज, श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी, कंधार येथील शिवाजी कॉलेज, अंबाजोगाई येथील योगेश्वरी कॉलेज, वसमत येथील हु. बहिर्जी स्मारक शिक्षण संस्था वापटी, पैठन येथील श्रीनाथ हायस्कूल, खुलताबाद येथील घृष्णेश्वर विद्यालय, अंबड येथील समर्थ विद्यालय इत्यादी शिक्षण संस्था मराठवाड्या स्थापन झाल्या. यामुळे उच्च शिक्षण घेण्याची सोय मराठवाड्यात झाल्यामुळे येथील

तरूणांनी उच्च शिक्षण घेऊन देशाच्या विविध भागामध्ये महत्त्वपूर्ण पदावर विराजमान झाले आहेत. आज मराठवाड्याचा जो काही विकास झाला आहे. यामध्ये स्वातंत्र्य सैनिकांनी स्थापन केलेल्या शैक्षणिक कार्यामुळे शक्य झाला आहे, हे विसरता येत नाही. बी बाब मराठवाड्याच्या दृष्टीने अतिशय गौरवास्पद आहे. त्यामुळे **मराठवाड्याच्या शिक्षण क्षेत्राच्या विकासात स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान** हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

संशोधनाचे महत्त्व

मराठवडा स्वातंत्र्य सैनिकांनी शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन वेगवेगळ्या भागात शैक्षणिक संस्थेची उभारणी केली. या शैक्षणिक संस्थेमध्ये मोठ्या प्रमाणात विविध जाती व धर्मातील तरूणाला शिक्षण घेण्याची संधी मिळाली. परंतु ज्या उद्देशाने स्वातंत्र्य सैनिकांनी शिक्षण संस्थेची उभारणी केली तो उद्देश सफल होऊ शकला नाही. कारण बहुतांश शैक्षणिक संस्था या राजकारणाचे आखाडे झाले आहेत. त्यामुळे आज देशापुढे वाढता भ्रष्टाचार, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, दारिद्र्य, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, बेरोजगारी इत्यादी प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यामुळेच पुन्हा एकदा स्वातंत्र्य सैनिकांनी उद्धात हेतूने स्थापन केलेल्या शैक्षणिक संस्थेचा हेतू या नवीन पिढीला कळावा यासाठीच **मराठवाड्याच्या शिक्षण क्षेत्राच्या विकासात स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान** या विषयावर संशोधन होणे महत्त्वाचे होते. म्हणूनच हा विषय निवडण्यात आला आहे.

समस्या विधान

मराठवाड्याच्या शिक्षण क्षेत्राच्या विकासात स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान

कार्यात्मक व्याख्या

1. **शिक्षण क्षेत्र :** सामान्यतः शिक्षण क्षेत्राची व्याख्या पुढीलप्रमाणे करता येईल, ज्या क्षेत्रात विद्यार्थ्यांना अध्यापन, प्रशिक्षण, मार्गदर्शन केले जाते आणि विद्यार्थी अध्ययन, संशोधन करतात त्या क्षेत्राला शिक्षण क्षेत्र म्हणतात.
2. **मराठवाडा :** महाराष्ट्र राज्यातील गोदावरी नदीच्या खोऱ्यात व आसपास वसलेल्या आठ जिल्ह्यांचा विभाग म्हणजेच मराठवाडा होय. मराठवाडा विभागाचे मुख्यालय छत्रपती संभाजीनगर येथे असून यामध्ये जालना बीड उस्मानाबाद लातूर नांदेड परभणी हिंगोली या जिल्ह्यांचा समावेश आहे.
3. **स्वातंत्र्य सैनिक :** जे व्यक्ती क्रूर सरकारच्या अन्यायाला विरोध करून जुलमी सरकार विरोधात बंड पुकारतात, विविध उपक्रमाच्या माध्यमातून लोकांमध्ये जागृती घडून आणते व लोकांवर होणाऱ्या अन्यायाबद्दल वाचा फोडतात आणि गरज पडल्यास सशस्त्र लढा देतात अशा व्यक्तीला स्वातंत्र्य सैनिक असे म्हणता येईल.

संशोधनाची उद्दिष्टे

1. मराठवाड्याच्या स्वतंत्रपूर्व शैक्षणिक परिस्थितीचा आढावा घेणे.
2. मराठवाड्याच्या शिक्षण क्षेत्रात योगदान देणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांचा अभ्यास करणे.
3. स्वातंत्र्य सैनिकांचा मराठवाड्ययाच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाचा अभ्यास करणे.
4. मराठवाड्यातील शैक्षणिक संस्थाच्या विस्तारामुळे झालेल्या परिवर्तनाचा अभ्यास करणे.
5. मराठवाड्यातील शिक्षण क्षेत्रास उपयुक्त शिफारशी सुचविणे.

संशोधनाची गृहीतके

1. मराठवाडा स्वतंत्र होण्याअगोदर मराठवाड्यात लोकसांच्या प्रमाणात शैक्षणिक सोयी नव्हत्या. (डॉ. चंद्रशेखर लोखंडे , २००४)
2. मराठवाड्याच्या सर्व जिल्ह्यातून शैक्षणिक क्षेत्रात स्वातंत्र्य सैनिकांने महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. (कमलाकर राऊत, २००३)
3. मराठवाड्याच्या शैक्षणिक विकासात स्वातंत्र्य सैनिकांचे महत्त्वपूर्ण असे योगदान राहिले आहे. (डॉ. भ. ग. कुंटे , १९७६)
4. मराठवाड्यातील शैक्षणिक संस्थाच्या विस्तारामुळे सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि विकासात्मक पातळीवर परिवर्तन झाले आहे. (श्री. देवेंद्र फडवणीस, २०२३)

संशोधन परिकल्पना

1. मराठवाड्याच्या शैक्षणिक क्षेत्रात स्वातंत्र्य सैनिकांने महत्त्वपूर्ण योगदान दिसून येते.
2. स्वातंत्र्य पूर्व मराठवाड्यात कोणत्याही प्रकारच्या शैक्षणिक सोयी उपलब्ध नव्हत्या.
3. मराठवाड्यातील शैक्षणिक संस्थाच्या विस्तारामुळे सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि विकासात्मक पातळीवर परिवर्तन झाले आहे.
4. स्वातंत्र्य सैनिकांचे विचार आणि शैक्षणिक कार्य येणाऱ्या अनेक पिढ्यांना दिशादर्शक ठरणारे आहेत.

शून्य परिकल्पना

1. शून्य परिकल्पनेमुळे संशोधनात कोणताही प्रभाव किंवा फरक पडत नाही.
2. शून्य परिकल्पनेमुळे मराठवाड्याच्या शैक्षणिक क्षेत्रात स्वातंत्र्य सैनिकांच्या कार्यावर कोणताही परिणाम पडत नाही.

3. शून्य परिकल्पनेचा मराठवाड्यातील शैक्षणिक संस्थाच्या विस्तारामुळे सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि विकासात्मक कार्यावर फारसा परिणाम दिसून येत नाही.
4. स्वातंत्र्य सैनिकांच्या कार्याचा मराठवाड्याच्या जडणघडणीवर प्रभाव जाणवत नाही.

संशोधनाची व्याप्ती

1. **क्षेत्र व्याप्ती** : सदरील संशोधनात मराठवाड्यातील ८ जिल्ह्याचा समावेश केला असून यामध्ये औरंगाबाद, उस्मानाबाद, बीड, जालना, नांदेड, लातूर, परभणी आणि हिंगोली जिल्ह्य पुरती मर्यादीत आहे.
2. **आशय व्याप्ती** : सदरील संशोधनाची आशय व्याप्ती मराठवाड्याच्या शिक्षण क्षेत्राच्या विकासात योगदान देणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांच्या जीवन चरित्र आणि शैक्षणिक विचार या बाबींशी संबंधित आहे.
3. **घटक व्याप्ती** : संकल्पीत संशोधन मराठवाड्याच्या शिक्षण क्षेत्राच्या विकासात योगदान देणाऱ्या स्वातंत्र्य सैनिक या घटकापुरते व्यापक आहे.

संशोधनाची मर्यादा

1. **क्षेत्र मर्यादा** : प्रस्तुत संशोधन मराठवाडा विभागातील शैक्षणिक क्षैत्रापुरते मर्यादीत असून यामध्ये औरंगाबाद, उस्मानाबाद, बीड, जालना, नांदेड, लातूर, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यापुरती मर्यादीत आहे.
2. **आशय मर्यादा** : प्रस्तुत संशोधन मराठवाड्याच्या शिक्षण क्षेत्राच्या विकासात योगदान देणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांच्या जीवन चरित्र आणि शैक्षणिक विचारांशी मर्यादीत आहे.
3. **घटक मर्यादा** : प्रस्तुत संशोधन मराठवाड्याच्या शिक्षण क्षेत्राच्या विकासात योगदान देणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांच्या कार्याशी मर्यादीत आहे.

संशोधनाची परिमर्यादा

1. प्रस्तुत संशोधन मराठवाडा विभागाच्या शैक्षणिक क्षैत्रापुरते मर्यादीत असून ही या संशोधनाची परिमर्यादा आहे.
2. प्रस्तुत संशोधनात मराठवाड्यातील स्वातंत्र्य सैनिकांचे जीवन चरित्राशी संबंधित असून ही या संशोधनाची परिमर्यादा आहे.
3. प्रस्तुत संशोधन मराठवाड्याच्या शिक्षण क्षेत्राच्या विकासात योगदान देणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांच्या कार्याशी संबंधित असून ही या संशोधनाची परिमर्यादा आहे.

संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधन हे भुतकाळातील कार्याशी संबंधित असल्यामुळे संशोधकाने या संशोधनासाठी ऐतिहासिक व क्षेत्रभेटी संशोधन पद्धतीचा अभ्यास करण्यात येणार आहे.

1. **ऐतिहासिक संशोधन पद्धती** : प्रस्तुत संशोधन हे आदर्शवादी असल्यामुळे संशोधकाने मराठवाडा स्वातंत्र्य सैनिकांच्या जीवन चरित्र व त्यांच्या शैक्षणिक योगदानाचा अभ्यास करण्यासाठी ऐतिहासिक या संशोधन पद्धतीचा अभ्यास करण्यात येणार आहे.
2. **क्षेत्र भेट संशोधन पद्धती** : मराठवाडा स्वातंत्र्य सैनिकांच्या जीवन चरित्र व त्यांच्या शैक्षणिक योगदानाचा अभ्यास करण्यासाठी त्यांच्याशी संबंधित क्षेत्रांना भेटी देण्याचे नियोजित आहे.

संशोधनाची साधने

1. **प्राथमिक साधने :** संशोधनाच्या प्राथमिक साधनामध्ये प्रश्नावली, मुलाखत, अनुसूची आणि क्षेत्र भेटी इत्यादीचा समावेश करण्यात येतो.
2. **द्वितीय साधने** : संशोधनाच्या द्वितीय साधनामध्ये प्रकाशित ग्रंथ, अनुवादीत ग्रंथ साहित्य, शासकीय व खाजगी संस्थाचे अहवाल, वर्तमानपत्रे. शोधप्रबंध,

नियतकालीके, मासिके, त्रैमासिके, इंटरनेट इत्यादी दुय्यम साधनाचा उपयोग करण्यात येणार आहे.

संख्याशास्त्रिय परिणामे

प्रस्तुत संशोधन विषय हा ऐतिहासिक असल्यामुळे यामध्ये सांख्यिकीचा उल्लेख येण्याची शक्यता फारच कमी आहे. असे असले तरी जिथे आवश्यकता भासल्यास तक्त्यामधील संख्याचे स्तंभालेख, वर्तुळ आणि आलेख इत्यादीमध्ये प्रमाण दाखविण्यासाठी केला जाईल.

संशोधनाची कार्यवाही

प्रस्तुत संशोधनाचा अभ्यास करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाहीचा उपयोग करण्यात येईल.

1. समस्येची निश्चिती करण्यात येईल.
2. साहित्याचा आढावा घेण्यात येईल.
3. उद्दिष्टे आणि गृहीतकानुसार कार्यपद्धती निश्चित केली जाईल.
4. साधन निर्मितीसाठी स्वातंत्र्य सैनिकांचे जीवन चरित्र अभ्यासले जाईल.
5. माहितीचे संकलन केले जाईल.
6. संकलीत झालेल्या प्राप्त माहितीचे विश्लेक्षण करण्यात येईल.
7. लिखानपूर्ण झाल्यानंतर ते मार्गदर्शकांकडून तपासून घेण्यात येईल.
8. नियम व अटीच्या अधीन राहून प्रबंधाची बांधणी करून ते विद्यापीठास सादर केले जाईल.

प्रकरण रचना

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन विषयाची प्रस्ताना, संशोधन समस्या, संशोधनाचे उद्दिष्टे, संशोधनाची गृहीतके, संशोधनाचे महत्त्व, संशोधन पद्धती, तथ्य संकलन पद्धती, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा आणि संशोधन आराखडा इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात आला आहे.

प्रकरण दुसरे : संशोधन साहित्याचा आढावा

प्रस्तुत दुसऱ्या प्रकरणात मराठवाडा व स्वतंत्र्य सैनिकांच्या अनुषंगाने शैक्षणिक व इतर दृष्टिकोणातून झालेल्या संशोधन साहित्याचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे : मराठवाड्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी

प्रस्तुत तिसऱ्या प्रकरणात मराठवाड्याच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे : मराठवाड्या शैक्षणिक विकासात स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान

प्रस्तुत चौथ्या प्रकरणात मराठवाड्याच्या उभारणीमध्ये स्वातंत्र्य सैनिकांनी मराठवड्याच्या विविध भागात केलेल्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे : सारांश, निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत पाचव्या प्रकरणात संशोधन विषयाचा सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी देण्यात येणार आहेत.

अंदाजपत्रक

अ.क्र.	**घटक**	**अपेक्षीत खर्च**
1.	विद्यापीठ शूल्क	१९,०००/-
2.	माहिती संकलन करणे	२३,०००/-
3.	डि.टी. पी. खर्च	१२,०००/-
4.	प्रुपरिडिंग खर्च	१०,०००/-
5.	प्रिंट खर्च	६,०००/-
6.	बाँड पेपर खर्च	४,०००/-
7.	प्रबंध बांधणी खर्च	१२,०००/-
	इतर खर्च	१७,०००/-
	एकूण खर्च	**१,०३,०००/-**

वेळापत्रक

अ.क्र.	**कामकाज**	**कालावधी**
1.	कोर्सवर्क तयारी	१-६ महिने
2.	संशोधन आराखडा	७-१२ महिने
3.	माहिती संकलन	१३-१८ महिने
4.	पहिले व दुसरे प्रकरण लिहिणे	१९-२४ महिने
5.	तिसरे व चौथे प्रकरण लिहिणे	२५-३० महिने
6.	अंतिम संशोधन अराखडा तयार करणे	३१-3६ महिने

संदर्भग्रंथ सूची

1. कीर धनंजय, १९८७, 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर' चरित्र, पॉप्युलर प्रकाशन, पुणे
2. दराडे एस.डी., २०१३, 'संशोधन पद्धती', प्रशांत पब्लिकेशन, जळगाव
3. 'शिक्षणाचे अधिष्ठान तात्त्विक सामाजिक व सांस्कृतिक', २०११, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक, प्रकाशन.
4. श्री. देवेंद्र फडवणीस, २०२३,उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, 'लोकराज्य, मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत वर्ष ७५', शब्दांकन श्री. प्रवीण कुलकर्णी, मुंबई.
5. ठोसर हरिहर, ११९८, 'प्राचीन मराठवाड्याचे व्यक्तिमत्त्व मराठवाडा : काल आणि आज', संकेत प्राशन, जालना
6. पाठक अरूणचंद्र, संपादक भगवान काळे, २०१०, 'महाराष्ट्राची कुळकथा, संयुक्त महाराष्ट्राचे महामथंन', संकेत प्रकाशन, जालना,
7. रोडे सोमनाथ, २०११, 'मराठवाड्याचा इतिहास', विद्या बुक्स पल्बिकेशन, औरंगाबाद,
8. आगलावे प्रदीप, २०००, 'संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे', विद्या प्रकाशन नागपूर,
9. अभ्यंकर वा. रा., १९९६, स्नेह वर्धन, नेतृत्वाचे पैलू, पब्लिकेशन हाऊस, पुणे,
10. मेदरकर प्रकाश, २००३, 'महाराष्ट्राचे शिल्पकार स्वामी रामानंद तीर्थ', महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई
11. कमलाकर राऊत,२००३, 'मुक्तीदाता',अक्षरसंवेदणा प्रकाशन, आंबेजोगाई.
12. कुंटे भ.ग., कार्यकारी संपादक व सचिव, १९७६, स्वातंत्र्य सैनिक चरित्रकोश, महाराष्ट्र राज्य, मराठवाडा विभाग, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई, खंड पहिला

13.देव प्रभाकर, १९९९, हैदराबाद मुक्तीसंग्राम-स्वातंत्र्य सैनिकांच्या मौखिक नोदी, प्रकाशक, कुलसचिव स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

14.रत्नाळीकर विठ्ठलराव, १९५९, हुतात्मा गोविंदराव पानसरे, प्रकाशक, हुतात्मा गोविंदराव पानसरे शिक्षण प्रसारकमंडळ अर्जापूर, नांदेड

15.साळुंके सतीश, २०१५, हैद्राबादचा स्वातंत्र्य संग्राम आणि बीड जिल्हा, प्रकाशन, सांस्कृतिक स्त्रोत एवं प्रशिक्षण केंद्र संस्कृति मंत्रालय भारत सरकार, नई दिल्ली,

16.भालेराव अनंत, १९८७, हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामातील आठवणी, प्रकाशक स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्था, औरंगाबाद

17.सायगावकर यशवंतराव, २००६, हैदराबाद मुक्ती आंदोलन के कुछ अध्याय, प्रकाशक, माणिकराव फुलेकर, बिदर

18.बचाटे श्रीनीवास, जानेवारी २०२४, मराठवाड्यातील कल्हाळी येथील स्वातंत्र्य सैनिकांचे ऐतिहासिक कार्य, विद्या वार्ता, जनरल परळी.

19.डॉ. चंद्रशेखर लोखंडे , २००४, 'हैद्राराबाद मुक्तीसंग्राम का इतिहास',प्रकाशक श्री. गुडमल आर्य, राज्यस्थान.

संशोधक | मार्गदर्शक

उमेश एकनाथराव वाघमारे | **प्राचार्य डॉ. बालाजी जी. गिरगावकर**